# प्रेस नोट दि. ०४/०९/२०२१

## मुंबई – पुणे एक्सप्रेस हायवे वर ट्रक ड्रायव्हरला लुटना-या टोळीचा पर्दाफाश, चौघानां अटक करुन , ३,१७,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत. गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड ची उल्लेखनीय कामगीरी.

दि.२/८/२०२१ रोजी पहाटे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन हददीतील **उर्से टोल नाकयाजवळ रस्त्याच्या कडेला दोन ट्रक चालक ट्रक थांबवून झोपले असताना त्यांना अज्ञात चार इसमांनी मारहाण करून त्यांच्याजवळील रोख रक्कम व मोबाईल चोरी केले होते** त्याप्रमाणे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गु.र.नं. ३०४/२०२१ भा.द.वि.क. ३९४,३४ प्रमाणे दाखल होता. सदर गंभीर घटनेची माहीती मिळताच मा.श्री.सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, श्री. प्रशांत अमृतकर सहा पोलीस आयुक्त गुन्हे— १ यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणने बाबत सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले, सहायक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळी, पो.हवा. ४३ सांळुके, पोहवा ७१८ बनसुडे, पो.ना. ८५८ राठोड, पोना. १००९ ठाकरे, पो.ना. १६०८ मालुसरे, पो.शि. ४९९ माने, पो.शि. १३०५ खेडकर, पो.शि. १८९८ गाडेकर, पो.शि. २५७१ गुट्टे पो.शि.२१९२ ब्रंह्मादे, यांचे आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे दोन पथके तयार केले होते. **पोहवा ७१८ दत्तात्रय बनसुडे यांना माहीती मिळाली** की सदर रॉबरी करणारे आरोपी हे खोपोली व खालापूर परीसरातील आहेत त्याप्रमाणे सपोनि राम गोमारे व पोउपनि राहूल कोळी यांच्या दोन टिम तयार करून खोपोली व खालापूर येथे रवाना केल्या होत्या त्याप्रमाणे **सपोनि राम गोमारे, पोउपनि राहुल कोळी, पोलीस अंमलदार बनसुडे, सांळुके, गाडेकर,गुट्टे, ठाकरे, ब्रम्हांदे यांच्या पथकानी** खोपोली पोलीस स्टेशन हद्दीतुन पारख फुड कंपनी समोरील मेन रोड वरुन आरोपी नामे **१)दिलीप गंगाराम जाधव, वय.२४ वर्षे रा. सांगडेवाडी ता. खलापुर जि. रायगड यास ताब्यात घेतले तसेच आरोपी नामे २) मंगेश भाऊ पवार वय. २२ वर्षे रा. निंबोडे ता. खालापुर जि. रायगड , ३) रविंद्र युवराज धारपवार वय. ३० वर्षे रा. विणेगाव ता. खालापुर जि. रायगड ४) गणेश नारायन चौधरी वय.३६ वर्षे रा. तुकसई ता. खालापुर जि. रायगड** यांच्या घरावर पहाटेच्या वेळी छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले.

आरोपी यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी दि. ०२/०८/२०२१ रोजी पहाटे आरोपी नामे गणेश नारायन चौधरी याच्या इको चारचाकी गाडी क्र. एम.एच.४६ बी.एम.३४२७ या गाडीने येवुन उर्से टोल नाका जवळ अंधाराचा फायदा घेऊन दोन ट्रक चालकांना दगडाने, हाताने मारहाण करून त्यांच्याकडील रोख व मोबाईल चोरल्याचे सांगीतले.

वरील चार आरोपी यांच्याकडून वेगवेगळया कंपनीचे एकूण सहा मोबाईल व गुन्हयात वापरलेले वाहन इको चार चाकी गाडी क्र.एम. एच.४६बी.एम.३४२७ असा एकूण ३,१७,०००/- रू चा मुददेमाल जप्त केला आहे.

**तसेच पोलीस अभिलेख चेक केला असता आरोपी नामे मंगेश भाऊ पवार वय. २२ वर्षे रा. निंबोडे ता. खालापुर जि. रायगड हा खालील गुन्ह्यात पाहीजे आरोपी आहे.**

१) कामशेत पोलीस स्टेशन गु.र.नं. २७७/२०२१ भा.द.वि.क. ३९५,३९४

२) खोपोली पोलीस स्टेशन गु.र.नं. १९०/२०१८ भा.द.वि.क. ३९५

३) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. ८९/२०२१ भा.द.वि.क. ३७९

**तसेच आरोपी नामे मंगेश भाऊ पवार वय. २२ वर्षे रा. निंबोडे ता. खालापुर जि. रायगड याच्यावर खालील प्रमाणे विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.**

१) कामशेत पोलीस स्टेशन गु.र.नं. २७७/२०२१ भा.द.वि.क. ३९५,३९४
२) खोपोली पोलीस स्टेशन गु.र.नं. १९०/२०१८ भा.द.वि.क. ३९५
३) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. ८९/२०२१ भा.द.वि.क. ३७९
४) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. १६३/२०१७ भा.द.वि.क. ३९९,४०२
५) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. ३०९/२०१९ भा.द.वि.क. ३९४,३४
६) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. १७४/२०१९ भा.द.वि.क. ३९४,३४
७) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. १००/२०१६ भा.द.वि.क. ३९४,३४

**तसेच आरोपी नामे रविंद्र युवराज धारपवार वय. ३० वर्षे रा. विणेगाव ता. खालापुर जि. रायगड याच्यावर खालील प्रमाणे विविध पोलीस स्टेशन ला गुन्हे दाखाल आहेत.**

१)खोपोली पोलीस स्टेशन गु.र.नं. १४२/२०१७ भा.द.वि.क. ३८०,४११,३४
२) खालापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. १७४/२०१७ भा.द.वि.क. ३९२,३४

सदरची कारवाई पोलीस आयुक्त मा. श्री कृष्णप्रकाश , अप्पर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त मुख्यालय, मा.श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-१ ,श्री.डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद गोकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळी, पोलीस अंमलदार दत्तात्रय बनसोडे, धनराज किरनाळे, सावन राठोड, ज्ञानेश्वर गाडेकर, भरत माने, दयानंद खेडकर, संदीप ठाकरे, श्यामसुंदर गुट्टे, गणेश मालुसरे, गोपाळ ब्रंह्मादे, राजेंद्र शेट्टे, नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप आयुक्त
मुख्यालय, पिंपरी चिंचवड